जळगाव (प्रतिनिधी) दि. २७ : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या सिलेज बेस्ड एरीया डेव्हलपमेंट प्रोग्राम (कॅडपी) नंदुरबारच्या सुकाणू समितीची सभा विद्यापीठात दि. २८ जानेवारी रोजी समिती अध्यक्ष डॉ. अनिल काकोडकर यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. यावेळी कुलगुरू प्रा.व्ही.एल. माहेश्वरी, डॉ. एस.व्ही. सापरे, डॉ. सी.डी. मायी यांच्या प्रमुख उपस्थितीसह सर्व सदस्य प्रत्यक्ष /ऑनलाईन पध्दतीने उपस्थित होते.

सभेच्या सुरुवातीस प्रकल्पाचे समन्वयक प्रा. के.एस.विश्वकर्मा यांनी गेल्या वर्षभरातील कामकाजाचा आढावा मांडतांना या प्रकल्पाद्वारे ११२ खेड्यांमध्ये झालेल्या ग्राम विकासाचा विविध प्रकल्पांची माहिती दिली. तसेच या प्रकल्पाद्वारे गोकर्ण फुलांपासून तयार केलेला ब्ल्यू चहा व सिलेज नायट्रोबॅक या बायो फर्टीलायझरचे तयार केलेले नमुन्यांबाबत माहिती दिली व या उत्पादनांना अधिकृत मान्यता मिळणेसाठी शासकीय परवानगीची कार्यवाही सुरु असल्याचे सांगितले. प्रकल्पाच्या गेल्या वर्षभरातील प्रगतीबाबत समिती अध्यक्ष व सर्व सदस्यांनी कौतुक केले. या सभेसाठी ज्येष्ठराम जोशी, अधिसभा सदस्य जयंत उत्तरवार, दर्शन शंकर, शेखर मांडे, डॉ.किरण कोकाटे, जी.जी. सोहनी, श्रीमती भारती भालेराव, श्रीमती प्रगती गोखले, डॉ. वृषाली कुलकर्णी, सह समन्वयक डॉ. एच.एल.तिडके, यांच्यासह प्रा. भूषण चौधरी, प्रा. एस.एन. पाटील, प्रा. के.एफ. पवार, प्रा. नवीन दंदी,इंजि. राजेश पाटील, अंजिक्य वराडपांडे इ. प्रत्यक्ष /ऑनलाईन उपस्थित होते.

**बातमी नं.२**

जळगाव (प्रतिनिधी) दि. २७ : रथ सप्तमीच्या निमित्ताने कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या योगशास्त्र विभाग येथे शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी तसेच परिसरातील निवासी कर्मचारी यांच्यासाठी व त्यांच्या कुटुंबासाठी त्याचबरोबर वसतिगृहातील विद्यार्थी, विद्यार्थीनी आणि अभ्यासक्रमास प्रवेशित विद्यार्थ्यांसाठी व सर्व नागरिकांसाठी १०८ सूर्यनमस्कार साधना दि. १४ ते २५ जानेवारी २०२६ या कालावधीत मुलींचे वसतीगृह नं. ४ क.ब.चौ उ.म.वि यथे आयोजित करण्यात आले होते. ह्या साधनेसाठी डॉ. गीतांजली भंगाळे (सहा.प्राध्यापक) यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. सूर्यनमस्कार साधना समारोप दि. २५ जानेवारी २०२६ रोजी विद्यापीठातील गांधी टेकडी परिसर येथे सकाळी ७.३० ते ९.३० या वेळेत करण्यात आला. समारोप कार्यक्रमाच्या प्रारंभी विद्यार्थ्यांनी सामूहिक १०८ सूर्यनमस्कार सादर करून सूर्योपासनेचे महत्त्व अधोरेखित केले

या समारोप कार्यक्रम प्रसंगी अध्यक्षस्थानी प्र-कुलगुरू प्रा. एस. टी. इंगळे, प्रा. डॉ. मनीषा इंदाणी, संचालक, आंतरविद्याशाखीय अभ्यास प्रशाळा, इंजि. राजेश पाटील, प्रमुख, योगशास्त्र विभाग यांची प्रमुख उपस्थिती होती. समारोप प्रसंगी सुरुवातीला इंजि राजेश पाटील यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. त्यात त्यांनी मकरसंक्रांती ते रथ सप्तमी दरम्यान सूर्यनमस्कार घालण्याचे महत्व तसेच सूर्यनमस्काराचे फायदे याबद्दल सांगितले. या कार्यशाळेस नियमित उपस्थित असलेल्या डॉ.शीतल वाघ, डॉ. भाग्यश्री दंदी, राहुल जाधव, निकिता देशमुख, पूजा संबारे, वृषभ राऊत या विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले. त्यात त्यांनी शरीराची लवचिकता वाढली, कार्य करण्याचा उत्साह वाढला, त्याच बरोबर इतर आजार बरे झाले असे मत त्यांनी व्यक्त केले.

मा. प्र-कुलगुरू महोदयांनी आपल्या अध्यक्षीय मनोगतात, सूर्यनमस्कार ही केवळ व्यायामपद्धती नसून भारतीय परंपरेतील एक संपूर्ण आरोग्यसाधना आहे. सूर्यनमस्काराच्या आरोग्यवर्धक परिणामांवर प्रकाश टाकत विद्यार्थ्यांच्या शारीरिक सुदृढतेसह मानसिक संतुलनासाठी योगसाधना अत्यावश्यक आहे असे प्रतिपादन केले. डॉ. मनिषा इंदाणी यांनी सूर्यनमस्कारच्या नियमित साधनेचे महत्त्व सांगितले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. लिंता चौधरी (सहा. प्राध्यापक) यांनी व आभार डॉ. गीतांजली भंगाळे (सहा. प्राध्यापक) यांनी केले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रा. एकनाथ नन्नवरे, माधवी तायडे, तुषार सोनवणे,रत्नाकर सोनार व भगवान साळुंखे यांचे सहकार्य लाभले.

**बातमी नं. ३**

जळगाव (प्रतिनिधी) दि. २७ : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव येथील शिक्षणशास्त्र विभाग व प्रधानमंत्री उच्चत्तर शिक्षण अभियान (PM-USHA), नवी दिल्ली यांच्या संयुक्त विद्यमाने "शिक्षक क्षमता वृद्धीकरण (Capacity Building of Teachers)" या विषयावर आयोजित दोन दिवसीय कार्यशाळेचे उद्घाटन मंगळवारदि. २७ जानेवारी रोजी विद्यापीठ परिसरात प्रा. आशुतोष पाटील संचालक, आजीवन अध्ययन आणि विस्तार विभाग तसेच PM-USHA प्रकल्पाचे प्रमुख यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. या प्रसंगी डॉ. महेश कोलतमे, एस एन. डी टी महिला विद्यापीठ मुंबई हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते, तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. मनीषा इंदाणी, संचालक आंतरविद्याशाखीय अभ्यास प्रशाळा होत्या.

उद्घाटनप्रसंगी मार्गदर्शन करताना डॉ. आशुतोष पाटील यांनी शिक्षकांची भूमिका ही केवळ अध्यापनापुरती मर्यादित नसून, संशोधन, नवतंत्रज्ञानाचा वापर आणि शैक्षणिक नवोपक्रम यामध्येही सक्रिय असणे गरजेचे असल्याचे सांगितले. बदलत्या शैक्षणिक धोरणांच्या पार्श्वभूमीवर शिक्षकांच्या कौशल्यवृद्धीसाठी अशा कार्यशाळा अत्यंत उपयुक्त ठरतात, असे त्यांनी नमूद केले.

अध्यक्षीय भाषणात डॉ. मनीषा इंदाणी यांनी शिक्षकांची सतत क्षमता वृद्धी ही गुणवत्तापूर्ण उच्च शिक्षणाची गरज असल्याचे प्रतिपादन केले. PM-USHA सारख्या योजनांमुळे उच्च शिक्षण संस्थांना शैक्षणिक गुणवत्ता वाढविण्यास मोठे बळ मिळत असल्याचे त्यांनी सांगितले.

कार्यशाळेच्या पहिल्या सत्रात प्रमुख पाहुणे डॉ. महेश कोलतमे यांनी MOOCs (Massive Open Online Courses), डिजिटल अभ्यासक्रमांची रचना, विकास व अंमलबजावणी याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. ऑनलाइन शिक्षणामुळे शिक्षण अधिक व्यापक, सुलभ व परिणामकारक होत असून शिक्षकांनी या संधीचा प्रभावी उपयोग करावा, असे त्यांनी सांगितले. सोबतच MOOCs (Massive Open Online Courses) निर्मिती संदर्भातील प्रक्रियेचे प्रात्यक्षिकाद्वारे मार्गदर्शन केले.

दुपारच्या सत्रात श्री. मनीष वनकर, ग्रंथपाल, व्ही. पी. होले शिक्षणशास्त्र महाविद्यालय, जळगाव हे शैक्षणिक प्रगतीसाठी संशोधन मेट्रिक्स आणि संशोधनासाठी डिजिटल लायब्ररी संसाधने या विषयावर मार्गदर्शन करणार आहे.

या दोन दिवसीय कार्यशाळेत MOOCs निर्मिती, संशोधन मेट्रिक्सद्वारे शैक्षणिक प्रगती, डिजिटल लायब्ररी संसाधनांचा वापर, कृत्रिम बुद्धिमत्तेचा शिक्षण व संशोधनातील उपयोग तसेच ICT आधारित अध्यापन-अध्ययन पद्धती यावर विविध विषयतज्ज्ञांकडून मार्गदर्शन करण्यात येणार आहे. कार्यशाळेला विद्यापीठातील प्राध्यापक, संशोधक व शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या प्रसंगी शिक्षणशास्त्र विभागातील डॉ. संतोष खिराडे, डॉ. स्वाती तायडे, संदीप वाघ, योगेश कोरडेवाड आणि एम.एड अभ्यासक्रमातील विद्यार्थी उपस्थित होते. सूत्रसंचालन आणि आभार प्रदर्शन डॉ. रणजीत पारधे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विभागातील शिक्षकेत्तर कर्मचारी जयेश पाटील, विवेक भावसार तसेच विभागातील प्रथम व द्वितीय वर्षातील सर्व विद्यार्थ्यांचे सहकार्य लाभले.

**बातमी नं. ४**

जळगाव (प्रतिनिधी) दि. २७ : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात लेखक, दिग्दर्शक, गीतकार अशोक नंदी कुरळे यांचा 'हासरी मैफील' हा कार्यक्रम विद्यापीठातील शिक्षक, शिक्षकेत्तर अधिकारी व कर्मचारी यांचे करीता दि. २७ जानेवारी रोजी दु. ३.३० वाजता संपन्न झाला. याप्रसंगी कुलगुरू प्रा.व्ही.एल. माहेश्वरी, प्र-कुलगुरू प्रा.एस.टी. इंगळे व कुलसचिव डॉ.विनोद पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती.

विद्यापीठातील शिक्षक, शिक्षकेत्तर अधिकारी व कर्मचारी यांना कार्यालयात कामकरतांना ताणतणावाला सामोरे जावे लागते त्याचा या ताणाचा परिणाम आरोग्यावर होत असतो. त्यामुळे विद्यापीठाकडून ताणतणावाचे व्यवस्थापन करण्याच्या अनुषंगाने अशोक नंदीकुरळे यांचा हासरी मैफील हा कार्यक्रम संपन्न झाला.

---

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२६ दिनांक: २७ जानेवारी, २०२६

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

जनसंपर्क अधिकारी करीता